# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २६/०९/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. खापा :-** अंतर्गत मौजा डोंगेघाट कन्हान नदीचे पात्रात येथे दिनांक २५/०९/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- मृणाल विलासराव हरडे वय २४ वर्ष रा.खापा तह. सावनेर हे मित्रासोबत कन्हान नदीकाठी बसले होते. तेव्हा फिर्यादी यांना कन्हान नदीचे पात्रात पांढऱ्या रंगाचे रेघाटी शर्ट तरंगताना दिसले. याबाबत फियादीने पोलीसांना फोन केला घटनास्थळी पाहणी केली असता एक अनोळखी पुरूष मृतक वय ४५ ते ५० वर्ष चा मृतदेह आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास जी.पो.उप.नि बारई मो.कं. ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड :-** अंतर्गत आमनदीचे पात्रामध्ये आंबोली शिवार येथे दिनांक २४/०९/२०२२ चे १२.०० वा. ते दिनांक २४/०९/२०२२ चे १७.०० वा. दरम्यान **आयुश महेंद्र रामटेके (मृतक), वय २१ वर्ष, रा. आंबोली ता उमरेड** हा त्याचे घरचे पाळीव जनावरे चारण्याचे काम करीत असतो. तो दि २४/९/२२ रोजी १२.०० दरम्यान जनावरे चारण्यासाठी आंबोली शिवार तसेच आम नदीचे पात्रामध्ये गेला होता. सायं ०६.०० वा. जनावरे घरी आली परंतु मृतक घरी न आल्याने त्याचा शोध घेवुन मिळून न आल्याने पोस्टे उमरेडला मिसींग नोंद केली. दि २५/९/२२ रोजी सशंशय आला की, काल घरचे जनावरे आमनदी कडून परत आले होते तर मृतक आमनदीत पडुन बुडाला असावा. त्याला पोहणे येत नव्हते म्हणुन पोस्टे. उमरेड पोलीसांसोबत व गोताखोरासोबत आमनदीमध्ये दिवसभर शोध घेतला सायं ०५.०० वा.दरम्यान आमनदीचे जवळ स्मशानभुमी जवळचे बंधाऱ्यात आयुश रामटेके याचा प्रेत अडकुन दिसला.तो पाण्याच्या प्रवाहात वाहुन जावुन बुडुन मरण पावला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- राजेंद्र दुलाराम रामटेके वय ४७ वर्ष, रा. आंबोली ता उमरेड यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार आनंद धात्रक मो क्र ९५४५३५५४७० हे करीत आहे.

**३) पो.स्टे. मौदा :-** अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील मौजा चेहडी शिवार येथे दिनांक २५/०९/२०२२ चे १४.३० वा. पुर्वी फिर्यादी नामे- अमृत सदाशिव काकडे, वय ३६ वर्ष, रा. चेहडी ता. मौदा हा आपल्या शेतामध्ये जात असता शमशान भूमी जवळ कन्हान नदीच्या वाहत्या पाण्यामध्ये एक अनोळखी पुरूष वय अदाजे ४० ते ५० वर्ष अंगामध्ये पाठऱ्या रंगाचा शर्ट घातलेला पायाकडे संपूर्ण नागडा असलेला प्रेत पुर्णपणे वाहून जातांनी दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार बेले हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**